## One Day Online Workshop on

# Digital Media and Digital Advertise

**Date 08-02-2022**



# डिजिटल मीडियावर आज कार्यशाळा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागातर्फे मंगळवार (ता. ८) सकाळी ११ वाजता 'डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात' विषयावर ऑनलाईन कार्यशाळा होत आहे.

कार्यशाळेत 'डिजिटल माध्यमे' विषयावर डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्‍वनाथ गरुड व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जर्नालिझम आणि मास कम्युनिकेशन विभागाचे योगेश बोराटे मार्गदर्शन करतील. 'डिजिटल जाहिरात' विषयावर लक्ष मीडियाच्या निहारिक महात्मे, व्हिज्युअल आर्टिस्ट मयूर कुलकर्णी, अश्‍वमेध मीडियाचे सुशांत उपाध्ये मार्गदर्शन करतील, अशी माहिती समन्वयक प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली.

**Sakal 08-02-2022**

# विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातर्फे आज ऑनलाईन राज्यस्तरीय कार्यशाळा

**कोल्हापूर (पुढारी वृत्तसेवा) :** शिवाजी विद्यापीठ मास कम्युनिकेशन विभागातर्फे मंगळवारी (दि.८) सकाळी ११ वाजता ऑनलाईन राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. 'डिजिटल मीडिया अँड डिजिटल अॅडव्हर्टायझिंग' या विषयावरील कार्यशाळेत डिजीटल कंटेंट एक्स्पर्ट विश्वनाथ गरुड, पुणे विद्यापीठातील सहायक प्रा. योगेश बोराटे, निहारिका महात्मे, मयूर कुलकर्णी मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी नोंदणी आवश्यक आहे. गुगल मीटवर ही कार्यशाळा होणार आहे. ऑनलाईन कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन वृत्तपत्रविद्या व संवाद आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले आहे.

**Pudhari 08-02-2022**

# डिजिटल मीडियासाठी मल्टिटास्किंग व्हा

## विश्वनाथ गरुड : 'डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात' विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

नवीन डिजिटल माध्यमांमुळे आशय निर्मितीमध्ये मोठी संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे आशय निर्मितीसाठी नव्या तंत्रज्ञानातील बदल अंगीकारणे गरजेचे आहे. याकरिता माध्यमांमध्ये मल्टिटास्किंग असणे गरजेचे आहे, असे मत डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्वनाथ गरुड यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा जर्नालिझम विभाग आणि मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने आयोजित 'डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात' या विषयावरील एकदिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रामध्ये ते बोलत होते.

गरुड म्हणाले, तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर संधीही उपलब्ध झाल्या आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या विभागाचे सहायक प्राध्यापक योगेश बोराटे म्हणाले, डिजिटल माध्यामाकडून मोठ्या प्रमाणात आशय आपल्याला मिळतो; परंतु नजीकच्या काळात या आशयाची गुणवत्ता आणि दर्जा यावर त्या आशयाचे महत्त्व ठरेल. ताज्या आशयाला अनुसरून तो ऐकण्यासाठी, पाहण्यासाठी लागणारा वेळ आणि विचारात घेऊन केली जाणारी आशय निर्मिती हे सध्याच्या आणि पुढील कालावधीचे वैशिष्ट्य ठरणार आहे.

लक्ष मीडिया प्रा. लि;च्या व्यवस्थापक निहारिका महात्मे यांनी डिजिटल जाहिरातीसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांनी आऊटडोअर जाहिरात माध्यमे आणि त्या माध्यमातील नवीन प्रवाह काय आहेत आणि त्यासाठी कशा स्वरूपामध्ये सर्जनशीलतेचा वापर करून जाहिरात करावी याविषयी मार्गदर्शन केले. व्हिज्युअल आर्टिस्ट मयूर कुलकर्णी यांनी जाहिरातीसाठी असणारा ग्राहकवर्ग लक्षात घेऊन जाहिरात करणे आवश्यक असल्याचे सांगितले. यामध्ये संधी मोठ्या असल्या तरी आशयामध्ये असलेली सर्जनशीलता महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. अश्वमेध मीडियाचे सुशांत उपाध्ये यांनी स्थानिक जाहिराती आणि जाहिरात निर्मितीमध्ये असलेल्या संधी याविषयी मार्गदर्शन केले.

सूत्रसंचालन डॉ. सुमेधा साळुंखे आणि विनायक राज्याध्यक्ष यांनी केले. विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार यांनी सहकार्य केले. सहायक प्राध्यापक डॉ. शिवाजी जाधव, संजय घोडावत विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे जयप्रकाश पाटील, परशुराम पवार, सोलापूर विद्यापीठातील तेजस्विनी कांबळे, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द येथील आनंद पांढरबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.



**Punyanagari 09-02-2022**


# डिजिटल मीडियासाठी मल्टिटास्किंग व्हा : गरूड

## जर्नालिझम विभाग, मास कम्युनिकेशन विभागातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन डिजिटल माध्यमांमुळे आशय निर्मितीमध्ये मोठी संधी निर्माण झाली आहे. त्यामुळे आशय निर्मितीसाठी नव्या तंत्रज्ञानातील बदल अंगीकारणे गरजेचे आहे, याकरिता माध्यमांमध्ये मल्टिटास्किंग असणे गरजेचे आहे, असे मत डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्वनाथ गरूड यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम विभाग व मास कम्युनिकेशन विभागातर्फे आयोजित 'डिजिटल मीडिया व डिजिटल जाहिरात' या विषयावरील एक दिवसीय राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्‍घाटन सत्रात ते बोलत होते. गरूड म्हणाले, तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत; परंतु त्यामुळे संधी उपलब्ध झाल्या आहेत. याप्रसंगी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या विभागाचे सहायक प्रा. योगेश बोराटे यांनी पत्रकारितेतील नव्या प्रवाहाविषयी मार्गदर्शन केले.


शिवाजी विद्यापीठातून

ते म्हणाले, डिजिटल माध्यामाकडून मोठ्या प्रमाणात आशाय आपल्याला मिळतो. परंतु, नजीकच्या काळात या आशयाची गुणवत्ता, दर्जा यावर त्या आशयाचे महत्त्व ठरेल.

लक्ष मीडियाच्या व्यवस्थापक निहारिका महात्मे यांनी डिजिटल जाहिरातीसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांनी आऊटडोअर जाहिरात माध्यमे व त्या माध्यमातील नवीन प्रवाह आणि त्यासासाठी सर्जनशीलतेचा वापर करून जाहिरात कशी करावी, याविषयी मार्गदर्शन केले. व्हिज्युव्हल आर्टिस्ट मयूर कुलकर्णी यांनी जाहिरातीसाठी असणारा ग्राहक वर्ग लक्षात घेऊन जाहिरात करणे आवशक असल्याचे सांगितले. अश्वमेध मीडियाचे सुशांत उपाध्ये यांनी स्थानिक जाहिराती, जाहिरात निर्मितीमध्ये असलेल्या संधी याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सुमेधा साळुंखे, विनायक राज्याध्यक्ष यांनी केले.

विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रस्ताविक केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंद्रशेखर वानखेडे, अनुराधा इनामदार यांनी सहकार्य केले. यावेळी सहायक प्रा. डॉ. शिवाजी जाधव, संजय घोडावत विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे जयप्रकाश पाटील, परशुराम पवार, मास कम्युनिकेशन विभाग, सोलापूर विद्यापीठातील तेजस्विनी कांबळे, वारणा महाविद्यालय ऐतवडे खुर्द येथील आनंद पांढरबळे उपस्थित होते.

## बांधकाम

**Pudhari 09-02-2022**

# डिजिटल माध्यमांमुळे आशय निर्मितीत संधी

## गरुड; ‘डिजिटल मीडियावर ऑनलाईन कार्यशाळा

आर. के. नगर, ता. ८ : नवीन डिजिटल माध्यमांमुळे आशय निर्मितीत मोठी संधी निर्माण झाली आहे. आशय निर्मितीसाठी नव्या तंत्रज्ञानातील बदल अंगीकारून माध्यमांत मल्टिटास्किंग होणे आवश्यक आहे, असे मत डिजिटल माध्यम तज्ज्ञ विश्वनाथ गरुड यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या जर्नालिझम व मास कम्युनिकेशन विभागातर्फे झालेल्या ‘डिजिटल मीडिया आणि डिजिटल जाहिरात'' विषयावरील एकदिवसीय ऑनलाईन कार्यशाळेच्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. श्री. गरूड म्हणाले, “तंत्रज्ञानामुळे पत्रकारितेपुढे आव्हाने निर्माण झाली आहेत. त्याचबरोबर संधीही उपलब्ध आहेत.”

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संज्ञापन आणि वृत्तपत्र विद्या विभागाचे प्रा. योगेश बोराटे म्हणाले, “डिजिटल माध्यामाकडून मोठ्या प्रमाणात आशय मिळतो. पण, नजीकच्या काळात आशयाची गुणवत्ता आणि दर्जा यावर त्या आशयाचे महत्त्व ठरेल.” निहारिका महात्मे यांनी डिजिटल जाहिरातीसंदर्भात मार्गदर्शन केले. त्यांनी आउटडोअर जाहिरात माध्यमे आणि त्या माध्यमातील नवीन प्रवाह काय आहेत आणि त्यासाठी कशा स्वरूपात सर्जनशीलतेचा वापर करून जाहिरात करावी याविषयी मार्गदर्शन केले.

मयूर कुलकर्णी यांनी जाहिरातीसाठी असणारा ग्राहक वर्ग लक्षात घेऊन जाहिरात करणे आवशक असल्याचे सांगितले. सुशांत उपाध्ये यांनी स्थानिक जाहिराती व जाहिरात निर्मितीत असलेल्या संधी विषयी मार्गदर्शन केले. डॉ. सुमेधा साळुंखे व विनायक राज्याध्यक्ष यांनी सूत्रसंचालन केले. विभागाच्या प्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले.

**Sakal 09-02-2022**